# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ८१/२०१४</u>

**श्रीरंग दौलता पवार म.वा. व इतर विाा काशिनाथ गंगाराम पवार व इतर**

CNR No.- MHST070003252014.

## <u>निशाणी क्र.६४ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१० यांच्या वतीने निशाणी क्र.६१ वर, दिनांक १६/०९/२०१६ रोजी, अर्ज दप्तरी दाखलबाबत झालेला आदेश रद्द करुन निशाणी क्र.६१ वर युक्तिवादाची संधी देणेबाबत, दाखल केला आहे. सदर प्रतिवादीचे कथन आहे की, प्रसतुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१० यांनी तुर्तातुर्त ताकीद अर्जावर वेळेत म्हणणे दाखल न केल्यामुळे विना म्हणणे आदेश पारित झाला होता. तो आदेश रद्द होवून मिळण्याकरिता प्रतिवादी क्र.१० याने निशाणी क्र.६१ वर अर्ज दाखल केला होता. वादीच्या वतीने निशाणी क्र.६३ वर म्हणणे दाखल केल्यानंतर प्रकरण निशाणी क्र.६१ च्या युकितवादाकरिता नेमण्यात आले. दरम्यान प्रकरण दुस–या न्यायालयाकडे वर्ग झाल्याची माहिती संबंधित प्रतिवादीस न झाल्याने तजवीज करता आली नाही. संबंधित प्रतिवादी यांना अपघातामुळे त्रास होवू लागल्याने वकिलांशी संपर्क साधता आला नाही. प्रतिवादीचा निशाणी क्र.६१ वरील अर्जावर योग्य तो आदेश होवून सोबत दाखल तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील म्हणणे स्वीकारणे न्यायाचे व गरजेचे आहे अन्यथा प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

२. सदर अर्जाचे मागील पृष्ठावर वादींतर्फे म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. वादींच्या वतीने कथन आहे की, सदर अर्ज खरा व प्रामाणिकपणाचा नाही. अर्जात नमुद कारण संयुक्तिक नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याचे हेतूने प्रस्तुत अर्ज दिला आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१० व त्याचे विद्वान विधिज्ञ यांचा वेळोवेळी पुकारा केला असता गैरहजर. सबब, प्रतिवादी क्र.१० तर्फे युक्तिवाद नाही.

४. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २) | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करीता :-**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा जाहीर ठराव होवून निरंतर ताकिदीकरिता आहे. दावा मिळकती स्थावर मालमत्ता आहेत. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना वेगवेगळ्या न्यायालयांकडे वर्ग झाल्याचे दिसून येते. त्यामुळे, अर्जात नमुद कारण संयुक्तिक असल्याचे स्पष्ट होते. नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार करता तसेच वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता उभय पक्षकारांना दाखल अर्जांच्या संदर्भात युक्तिवाद करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परिणामी, न्यायनिर्णय करणे सुलभ होणार आहे. अर्ज मंजूर केल्यास वादींचे काही एक नुकसान होणार नाही तसेच वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी क्र.१० यास नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जावून प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :-**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. अर्जात नमुद कारण निशाणी क्र.६१ वरील दि.१६/०९/२०१६ रोजीचा अर्ज दप्तरी दाखल करणेबाबतचा आदेश रद्द करणेस पुरेसे आहे. तथापि, दि. १३/०८/२०१५ म्हणजेच निशाणी क्र.६१ वरील अर्ज दाखल तारखेपासून ते प्रस्तुत अर्ज दाखल दि. २५/०१/२०१७ या एकूण १७ महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधीत प्रतिवादी क्र.१० याने युक्तिवाद न केल्यामुळे विलंब झाला आहे. त्यामुळे, वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, संबंधीत प्रतिवादी क्र.१० वर वाजवी खर्च एकूण १७ महिन्यांकरीता प्रतिमाह करीता रक्कम रू.१००/- बसवणे न्यायाचे व योग्य आहे. सबब, न्यायचेदृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

**- आ दे श -**

१) प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.६४ मंजूर करण्यात येतो.

२) निशाणी क्र.६१ वर, दिनांक १६/०९/२०१६ रोजी, अर्ज दप्तरी दाखल करणेबाबतचा झालेला आदेश, संबंधीत प्रतिवादी क्र.१० याचेवर रक्कम रुपये १,७००/- खर्च बसवून खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेस अगर त्यादिवशी देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३) संबंधीत प्रतिवादी क्र.१० ने आदेशाची पुर्तता केल्यास, प्रकरण निशाणी क्र.६१ वरील अर्जाच्या युक्तिवादाकरिता ठेवण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.08.11 17:27:41 +0530

(अ.अ. उत्पात)
५ व सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.

दिनांक: ११/०८/२०२५.